झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनीः ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email : info@sra.gov.in

**परिपत्रक क्र.९७**

क्र.झोपुप्रा/ विनि/ परिशिष्ट ३/ २००९/३९२.
दि.१३.४.२००९.

## परिपत्रक

झो.पु. प्रकल्प राबविणाऱ्या विकासकांची आर्थिक कुवत पडताळण्यासाठी परिशिष्ट-३ विहित करण्यात आले आहे. शासनाच्या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणांतर्गत परिशिष्ट-३ प्रमाणित करण्यासंबंधात शासनाकडून मार्गदर्शक तत्वे अंमलात येईपर्यत दरम्यान काळात दि.१/११/२००६ पासून परिशिष्ट-३ प्रमाणित करतांना खाजगी जमीन तसेच राज्य शासनाच्या, म्हाडा, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या मालकीच्या जमीनीवरील प्रकल्पांकरिता पुनर्वसन प्रकल्प बांधकाम खर्चाच्या २० टक्के रक्कमेचे बँक हमी पत्र घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

जागतिक आर्थिक मंदीमुळे बँक हमी पत्रासाठी ९०% ते १००% रक्कम कायम स्वरूपी गुंतवावी लागत असल्याने विकासकाकडे प्रकल्पासाठी आवश्यक असलेले खेळते भांडवलाची रक्कम अपुरी ठरत असल्याने परिशिष्ट-३ प्रमाणित करतांना घेण्यात येणारे बॅकहमी पत्राची २० टक्के रक्कमेत काही प्रमाणात सवलत /कमी करावी अशी मागणी केली जात आहे.

विकासकाकडून घेण्यात आलेल्या २०% हमीपत्रामुळे विकासकाची रक्कम बॅकेकडे ठेवावी लागते. विकासक लॅंड प्रिमियमची रक्कम ही भरणा करीत आहेत. याशिवाय विकासकास त्यांचे भांडवलखाती २०% रक्कम ही ठेवावी लागत आहे. यामुळे विकासकाची त्याचा पुनर्वसन प्रकल्प सुरु होत असतानाच मोठया प्रमाणावर रक्कमा अडकून रहात आहेत, तसेच जागतिक आर्थिक मंदीमुळे विकासकास प्रकल्पासाठी निधीची उभारणी करण्यास देखील अडचणी येत आहेत.

या सर्वाचा परिणाम पुनर्वसन प्रकल्प जलदगतीने होण्यास बाधा येऊ नये यासाठी तसेच जागतिक आर्थिक मंदीमुळे सवलत म्हणून राज्य शासनाच्या, म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जमिनीवरील झो.पु.प्रकल्प राबविणा-या विकासकांकडून प्रकल्पाच्या पुनर्वसन घटकाच्या बांधकाम खर्चाच्या रक्कमेच्या २० टक्के रक्कमेचे बॅंकहमी पत्राऐवजी १० टक्के रकमेचे बॅंक हमी घेण्यात यावे. खाजगी जमिनीवरील झो.पु.प्रकल्प राबविणा-या विकासकांकडून प्रकल्पाच्या पुनर्वसन घटकाच्या बांधकाम खर्चाच्या सुधारित (Revised) रकमेच्या २० टक्के रकमेचे बॅंकहमी पत्र घेण्यात यावे.

वित्त नियंत्रक यांनी यापुढे परिशिष्ट -३ निर्गमित करतांना ही बाब लक्षात घ्यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत,

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
२. विशेष कार्य अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
३. सचिव यांचे स्वीय सहाय्यक
४. वित्त नियंत्रक यांचे स्वीय सहाय्यक
५. उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा
६. विधी सल्लागार, झोपुप्रा
७. उप मुख्य अभियंता, झोपुप्रा
८. कार्यकारी अभियंता, झोपुप्रा
९. अभियांत्रिकी शाखा, झोपुप्रा
१०. सहाय्यक संचालक नगर रचना, झोपुप्रा
११ सहाय्यक निबंधक, झोपुप्रा
१२ विशेष भूसंपादन अधिकारी,धापुप्र
१३ उप मुख्य अभियंता समन्वयक, धापुप्र
१४ समाज विकास अधिकारी, धापुप्र
१५ प्रशासन निवडनस्ती
१६ निवडनस्ती.